**<u>राजपूत भामटा,परदेशी भामटा व परदेशी भामटी</u>**
**जाती प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक :- सीबीसी-१०/२०००/प्र.क्र. १९० /मावक-५**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- २७ जून २००१.**

**वाचा :- १) शासन परिपत्रक,समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक -सीबीसी-१६९१/(३)/मावक-५, दि. ८ मे १९९१.**
**२) शासन परिपत्रक,समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक -सीबीसी-१६९०/(३)/मावक-५, दि. २८ जानेवारी १९९२.**
**३) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक- सीबीसी-१०९६/प्र.क्र.४८/मावक-५, दि. ३ जून १९९६.**
**४) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक- सीबीसी-१०९६/प्र.क्र.४८/मावक-५, दि. २० जून १९९६.**
**५) शासन परिपत्रक, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक- सीबीसी-१०९५/प्र.क्र.२४२/मावक-५, दि. २५ ऑगस्ट १९९७.**
**६) शासन परिपत्रक, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक- सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.१९०/मावक-५, दि. २१ जून २००१.**

## <u>प रि प त्र क</u>

राजपूत भामटा, परदेशी भामटा व परदेशी भामटी या जातीच्या लोकांना जातीची प्रमाणपत्रे देण्याबाबतच्या सूचना वरील अ.क्र.५ येथील शासन परिपत्रकाअन्वये सर्व सक्षम प्राधिका-यांना देण्यात आल्या आहेत. असे असतानाही या जातीच्या लोकांना जातीची प्रमाणपत्रे वेळेवर दिली जात नाहीत अशा तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्याअनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदयांकडे दि. २७ जून २००१ रोजी झालेल्या बैठकीत त्यांनी दिलेल्या आदेशांनुसार राजपूत भामटा, परदेशी भामटा व परदेशी भामटी या जातीच्या लोकांना जातीची प्रमाणपत्रे देताना सक्षम प्राधिका-यांनी खालील सूचनांचे पालन करावे :-

शासन निर्णय, दि.३ जून १९९६ मध्ये जातीची प्रमाणपत्रे मिळविताना कोणकोणती कागदपत्रे सादर करावीत याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करावी अशाप्रकारचा आग्रह संबंधित सक्षम प्राधिका-यांकडून केला जातो. त्यामुळे या जातीचे लोक जातीची प्रमाणपत्रे मिळण्यापासून वंचित रहातात. अर्जदाराने विविध कागदपत्रांपैकी पुरेसे पुरावे

सादर केल्यास राजपूत भामटा, परदेशी भामटा व परदेशी भामटी या जातीच्या लोकांना जातीची प्रमाणपत्रे देण्यात यावे त्यासाठी सर्व कागदपत्रांचा आग्रह धरण्यात येऊ नये.

२. वरील सूचनेच्या अनुषंगाने अर्जदारास जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबत टोलवाटोलवी करीत असल्याच्या शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्यास या विभागाचे शासन परिपत्रक, क्रमांक-सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.१९०/मावक-५, दि. २१ जून २००१ मधील परिच्छेद-६ नुसार आपल्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(श्या. ना. धकाते )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति :-**
**सर्व जिल्हाधिकारी,**
**सर्व उप जिल्हाधिकारी,**
**सर्व उप विभागीय अधिकारी (महसूल),**
**त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अघिपत्याखालील तहसिलदारांना हयाबाबत**
**सूचना द्याव्यात.**
**सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी**
**निवड नस्ती,का-मावक-५**